# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-२५ दिनांक - ३०/०१/२०२४

## एक देशी बनावटीची पिस्टल, ०२ जिवंत काडतुसांसह ०१ आरोपीतास अटक
## पेल्हार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २९/०१/२०२४ रोजी १४:०० वा.चे सुमारास पेल्हार गाव, पेल्हार हॉटेलच्या जवळ, ता. वसई जि. पालघर येथे एक इसम त्यांचे कब्जात विना परवाना बेकायदेशिर रित्या अग्निशस्त्र घेवुन येणार असल्याची गुप्त बातमीधारकांकडून खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना मिळाल्याने, सदर बातमीचे आधारे त्यांनी लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना सदर ठिकाणी सापळा रचुन सदर इसमास ताब्यात घेऊन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी सापळा रचुन शिताफिने, सदर इसमास ताब्यात घेतले. तेव्हा त्याने त्याचे नाव - भव्य चैतन्य दवे, वय २५ वर्षे, रा. दहिसर पश्चिम मुंबई असे सांगितले. नमुद आरोपीताची अंगझडती घेता, त्यांचे कब्जात **०१ देशी बनावटीची पिस्टल,** व **०२ जिवंत काडतुस,** असा **एकुण ४८,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ७५/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), (३), १३५ प्रमाणे दि.२९/०१/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, सा़े, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सा़े, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सा़े, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सा़े, श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.निरी. तुकाराम भोपळे, पो.हवा. योगेश देशमुख, फिरोज तडवी, अविनाश देसाई, तानाजी चव्हाण, पो.अं. रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखील मंडलिक, राहुल कर्पे, दिलदार शेख पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.